महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुख्य इमारत, १ ला मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दूरध्वनी क्र.०२२ २२०४८३५५ Email Id :- j1a.revenue@maharashtra.gov.in

क्र.एनएपी-२०२२/प्र.क्र.५०/ज-१अ दिनांक :- ०७/०४/२०२२

प्रति,

सर्व जिल्हाधिकारी,

**विषय :-** शासन परिपत्रक, दिनांक ५ फेब्रुवारी,२०१८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अकृषिक कराच्या आकारणीच्या वसूलीस तात्पुरती स्थगिती देण्याबाबत..

**संदर्भ :-** शासन परिपत्रक क्रमांक एनएपी-२०१५/प्र.क्र.४७/टी-१, दिनांक ०५ फेब्रुवारी, २०१८

उपरोक्त विषयावरील संदर्भाधीन शासन परिपत्रक दिनांक ५ फेब्रुवारी,२०१८ मध्ये नमूद केल्यानुसार, अकृषिक आकारणीच्या वसूलीस दिलेली स्थगिती उठवण्याबाबत व सुधारित अकृषिक प्रमाणदराच्या आधारे, अकृषिक आकारणी करुन ती वसूल करण्यासंदर्भात आपणास दिशानिर्देश निर्गमित करण्यात आले आहेत. सदर निर्णयानुसार, साधारणपणे सन २००१ ते २००६ / २००६ ते २०११ /२०११ ते २०१६ / २०१६ ते २०२१ अशा हमी कालावधीत कशाप्रकारे अकृषिक दर निश्चित करुन बिनशेती सा-याची रक्कम आकारणी करावी, याबाबत क्षेत्रीय अधिका-यांना मार्गदर्शन करुन अकृषिक कराची आकारणी वसूल करण्याच्या अनुषंगाने दिशानिर्देश देण्यात आलेले आहेत.

०२. यानुषंगाने, मला आपणांस असे कळविण्याचे निदेश आहेत की, संदर्भाधीन दिनांक ५ फेब्रुवारी, २०१८ च्या शासन परिपत्रकात नमूद केलेल्या दिशानिर्देशाप्रमाणे क्षेत्रीय स्तरावर करण्यात येणाऱ्या अकृषिक कराच्या आकारणीच्या वसूलीस पुढील आदेश होईपर्यंत याद्वारे तात्पुरती स्थगिती देण्यात येत आहे.तसेच यानुषंगाने सक्तीच्या वसुलीसंदर्भात केलेली कार्यवाही थांब्विणेत यावी.

७/०४/२०२२

**(रमेश चव्हाण)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

(१) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
(२) मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
(३) अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी
(४) सर्व विभागीय आयुक्त (कोकण, पुणे, नाशिक, अमरावती, औरंगाबाद व नागपूर)
(५) सर्व अप्पर जिल्हाधिकारी
(६) निवडनस्ती (ज-१अ)